Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- XII | ISSUE- II | FEBRUARY | 2025 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.379 | ISSN 2349-638x

# मुस्लिम मराठी कादंबरी

संशोधक विद्यार्थी
**विनोद अनिलराव तुंगे**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**प्रस्तावना :-**

समाजजीवन हा साहित्याचा विषय असतो.साहित्यिक हा समाजातीलच एक विशिष्ट असा घटक म्हणून समजला जातो. समाजातील वापरल्या जाणाऱ्या भाषेचा प्रभाव, सांस्कृतीक जीवनाचा प्रभाव, समाजातील चालीरितीचा प्रभाव त्याच्या प्रस्तुत लेखनातून तो व्यक्त करत असतो.व त्यातूनच त्याची वेगळी ओळख आपल्या साहित्यकृतीच्या कलाकृतीतून तो व्यक्त करताना दिसतो. साहित्याचे मूळ म्हणले तर समाज व समाजातील भाषा हेच आपण सागू शकतो.

साहित्यात कादंबरी हा वाङ्:मय प्रकारा १५० वर्षापेक्षा जुना आहे. साहित्य ही एक कला आहे.साहित्य ही कला शब्दांच्या माध्यमातून मांडलेली आहे. या साहित्यात कथा,नाटक, कादंबरी, कविता अशा प्रकाराचा समावेश होतो.

मराठी कादंबरीच्या असलेल्या क्षेत्रात मुस्लिम लेखकांचे योगदान अगदी अल्प असले तरी त्याच्या लेखनातील असणाऱ्या ठसठसीतपणामुळे व योग्य मांडणीमुळे आज मुस्लिम मराठी कादंबरीचे एक वेगळे अस्तित्व असलेले दिसून येते. मराठी कादंबरीच्या सुरूवातीच्या शंभर वर्षामध्ये मुस्लिम कादंबरीची अगदी अल्प असलेली आपणास दिसते.१९३० च्या सुमारास सय्यद अमीन यांच्या 'अबला' या कादंबरीचा उल्लेख आढळतो.सुरूवातीच्या काळात रंजनपर आणि सामाजिक राजकीय आशय असणाऱ्या कादंबऱ्या दिसून येतात. आता मात्र कादंबरी वास्तवाकडे झुकलेली दिसून येते.याच काळात वास्तववादी, अतिवास्तववादी लिखाणही होऊ लागले.

समाजजीवन हा साहित्याचा विषय असतो. साहित्यिक हा समाजातीलच एक घटक असतो. समाजातील भाषेचा प्रभाव, संस्कृतीचा प्रभाव, समाजातील चालीरिती, रूढी परंपराचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर उमटत असतो. यातूनच साहित्यीकाचे साहित्य एक नवा आकार घेत असते.साहित्याचा मुख्य गाभा समाज व समाजातील भाषा हाच असतो.

**मुस्लिम साहित्याची संकल्पना:-**

मराठी वाङ्:मयाच्या इतिहासात मध्ययुगीन काळापासून मुस्लिम मराठी साहित्याची परंपरा पहावयास मिळते. भागवत संप्रदायातील कवी येगसंग्रामकार शेख महमद म्हणतात, 'यति मुसलमान । महाराष्ट्र वचने ऐकती आवडीने' तर शेख सलीम महमद आपल्या काव्यग्रथांत म्हणतात, 'आम्ही जातीने ब्राम्हण आमचे सोयरे मुसलमान' या दोन कवींचा विचार करता हे कवी धर्माने मुसलमान आहेत. पण मराठी भाषा आणि संस्कृती याविषयी त्यांना अत्यंत आदर आहे.हीच संत काव्याची परंपरा मध्ययुगीन काळातील अनेक शाहिरांनी सांभाळली. शाहीर सगनभाऊ हे त्याचे उत्तम उदाहरण होय. पण मध्ययुगीन कालखंडाचा विचार करता. 'मुस्लिम मराठी साहित्य' अशी संकल्पना या साहित्यात कोठेच पहावयास मिळत नाही. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मुस्लिम मराठी साहित्य या संकल्पनेचा विचार सर्वप्रथम सांगलीचे सय्यद अमीन यांनी केला. त्यांनी १९३५ मध्ये 'मुस्लिम मराठी साहित्य' याच नावाने साप्ताहिक सुरू केले. तसेच सय्यद अमीन यांनी मराठी भाषेत विपुल अशी साहित्य निमिर्ती केली.पण त्यांच्या साहित्यात आणि साप्ताहिकात मुस्लिम मराठी साहित्य या संकल्पनेविषयी कोठेच भाष्य पहावयास मिळत नाही. केवळ साप्ताहिकाच्या नावापुरतीच ती संकल्पना मर्यादित राहिली. त्यांच्या जाण्यानंतर मात्र समीक्षक श्री.के. क्षीरसागर यांनी त्यांच्यावर 'एक सत्वस्थ मुस्लिम मराठी साहित्यिक' या शीर्षकाचा एक मृत्युलेख लिहिला होता. या मृत्युलेखाने प्रथमच मराठीतील मुस्लिम साहित्यिक समीक्षकांच्या नजरेतून समारे आला.

**मुस्लिम मराठी कादंबरीचे स्वरूप :-**

१९३० च्या सुमारास अमीन यांच्या 'अबला' या कादंबरीचा उल्लेख आढळतो. साठच्या दशकापर्यंत एकाही मुस्लिम कादंबरीकाराची नोंद आढळत नाही. पण याच

दरम्यान हमीद दलवाई याच्या 'इंधन' या कादंबरीत आशय,विषय आणि अभिव्यक्तीतील नाविन्य जपत या क्षेत्रात दमदार पाउल टाकले. १९७० च्या सुमारास इब्राहीम खान यांची 'अंधाराचे अश्रू' ही कादंबरी मराठीतून प्रकाशीत झाली. त्यानंतर दीर्घ कालावधीने फ.म.शहाजिंदे यांची 'मीतू' ही १९६४साली पत्रात्मक कादंबरी आली. राजन खान यांच्या कथात्मक साहित्याचे मराठी वाङ:मयात मोलाची भर घातली आहे. कादंबरी हा विस्तृत जीवनाचा आविष्कार असला तरी मुस्लिमांच्या जीवनाचे विविध स्तर आणि परिणामे सामाजिक, माणसिक, सांस्कृतिक, तात्त्विक अशा विविध पातळ्यावरून मुस्लिमांचे जीवन मुस्लिम मराठी कादंबरीतून चित्रित होते.राजन खान यांनी वेगवेगळ्या कादंबऱ्याच्या निर्मिती करून त्यांनी आपला वेगळा असा ठसा उमठविला.१९९९च्या शब्दालय या दिवाळी अंकातून रफिक सुरज मुल्ला या तरूण लेखकाची 'रहबर' ही कादंबरी प्रसिध्द झाली. मुस्लिम समाजातील असणाऱ्या रूढी, परंपरा याबरोबरच मुस्लिम तरूणाच्या मानसिकतेचा प्रत्यकारी मागोवा त्यानी आपल्या कादंबरीत घेतलेला दिसतो. २००० साली शकील शेख यांची 'जुबा' ही कादंबरी प्रसिध्द झाली. रझाकार चळवळीनंतरच्या काळात मुस्लिम कुटुंबाची झालेली वाताहत यांच्यामधील झालेले अत्याचाराचे चित्रण लेखकाने या कादंबरीतून मांडलेले दिसते.

**मुस्लिम मराठी कादंबरीची परंपरा:-**

यमुनापर्यटन प्रवृत्तीच्या कादंबरीमध्ये वाङ:मयात सय्यद अमीन यांनी १९३० च्या सुमारास लिहलेल्या 'अबला' कादंबरीचा समावेश करता येतो. कारण यातील स्त्री, पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे अबला झालेली आहे. हमीद दलवाई याची इंधन ,हीमायत खान याची अंधाराचे अश्रु, राजन खान याची काफर, रफिक सूरज याची रहबर आणि शकील शेख यांची जुबा या सर्व कादंबऱ्याचा विचार या यमुनापर्यटन प्रवृत्तीत करता येतो. कारण या मुस्लिम मराठी कादंबरी ही योग्य आशा आशयात्मकतेला पोहाचताना दिसतात. मुस्लिम समाजजीवनात उदासिनतेच्या अनेक छटा पसरू लागतात. अशा वेळी तो आपली मानसिकता शांती हरवून बसतो. तेव्हा त्याला एका मार्गदर्शकाची आवश्यकता असते. तेव्हा ती अल्ला च्या रूपानी पुर्ण होताना दिसते.

**समारोप :-**

मुस्लिम मराठी कादंबरीकाराने प्रस्तापित व पांढरपेशीय कादंबरीला बगल देऊन वास्तवीक जीवनाचे चित्रण आपल्या असणाऱ्या कादंबरीतून केलेले दिसते. प्रत्यक्ष वाट्याला येणाऱ्या अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी कादंबरीची निवड ही त्यांनी केलेली आहे. त्यांना ज्या समस्यांना सामोरे जावे लागले याचा आढावा या कादंबरीतून घेण्यात आला आहे. कादंबरी लेखनातील प्रदीर्घ एकांताची आवश्यकता असते. पण फाळणीनंतर मुस्लिम मन,भय, संशय आणि द्वेश यांच्या चरकात पिळून निघत आहे.मनस्वास्थ आणि एकांत असल्याशिवाय कादंबरीलेखन अवघड असते. तरीही मुस्लिम लेखकांनी कादंबरी लेखन केले आहे.ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे.

**संदर्भसूची :-**

१) प्रा.फ.म.शहाजिंदे, मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप, भूमी प्रकाशन,लातूर

२) डॉ.अक्रम पठाण, मुस्लिम मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन,नागपूर

३) डॉ.ताहेर पठाण,मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान,संकल्प प्रकाशन,लातूर

४)रफीक सूरज,रहबर, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर.